महाराष्ट्र शासन

**Annexure-B -I-001**

क्रमांक = पीईसी ७०९१/ ५१२६३/[४४२०]तांशि-१
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक ९ सप्टेंबर . १९९२.

प्रति,

सचिव / अध्यक्ष,
दि ऑल इंडिया श्री. शिवाजी मेमोरियल सोसायटी,
५५/५६ , शिवाजीनगर, पुणे ४११००५.

विषय-- विनाअनुदान तत्त्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता.

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपल्याकडून प्राप्त झालेला विनंती अर्ज व त्यास अनुसरून तंत्रशिक्षण संचालक , महाराष्ट्र राज्य यांनी केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य-शासनाने आपल्या संस्थेची शिफारस अखिलभारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे पूर्वमान्यतेसाठी दिनांक २२ जुलै, १९९१ रोजी केली होती. राज्य शासनाची सदर शिफारस लक्षात घेऊन अखिलभारतीय तंत्रशिक्षण परिषदेने आता त्यांच्या पत्र क्रमांक- एफ. २७-६६/९२-आयतीटी दिनांक १९ ऑगस्ट, १९९२ अन्वये आपल्या संस्थेस कांही अटी व शर्तीवर "बोरी भडक , तालुका दौंड, जिल्हा-पुणे " येथे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास पूर्व मान्यता दिली आहे. अखिलभारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या सदर पूर्वमान्यतेस अनुसरून शासन आता याद्वारे आपल्या संस्थेस १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून " बोरी भडक, तालुका दौंड, जिल्हा-पुणे " येथे खालील पदवी अभ्यासक्रमासह विनाअनुदान तत्त्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी देत आहे :--

| | पदवी अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १. | यंत्र अभियांत्रिकी | ६० |
| २. | विद्युत अभियांत्रिकी | ६० |
| ३. | इलेक्ट्रॉनिक्स | ६० |

२. वरील परवानगी पुढे दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे :-

१. शासन निर्णय , शिक्षण व सेवायोजन विभाग क्र- टिईएम-३३८२/११९८३६/[१९०] /तांशि-४अ , दिनांक २१ मे, १९८३ अन्वये विनाअनुदान संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती [शासन --निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे ] तसेच अखिलभारतीय तंत्रशिक्षण परिषदे

..२/-

त्यांच्या दिनांक १९ ऑगस्ट, १९९२ च्या मान्यतापत्रात विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.

२. वर परवानगी देण्यात आलेले पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी पुणे - विद्यापीठाची संलग्नीकरणास मान्यता घेण्यात येईल.

३. वर अट क्र[१] मध्ये अंतर्भूत असणारे कागदपत्र व औपचारिक बाबी तंत्रशिक्षण संचालकांच्या सहमतीने समाधानकारकरित्या पूर्ण करण्यात येतील.

४. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिलभारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल.

५. राज्य शासनाने मान्यता दिलेल्या प्रवेशनियमांनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा लागेल.

३. आपणास विनंती करण्यात येते की याबाबतीत आवश्यक त्या औपचारिक बाबी पूर्ण करण्यासाठी आपण संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याशी त्वरित संपर्क साधावा व सर्व बाबींची पूर्तता केल्याशिवाय आणि पुणे विद्यापीठाने संलग्नीकरणास परवानगी दिल्याशिवाय अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये.

आपला विश्वास,

[ मी. तु. धनमेहेर]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी —

१. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
३. कार्यासन अधिकारी, विशि-२ [ उ. व तं. शि. आणि सेयो. वि. ]

प्रत माहितीसाठी –

१. अतिरिक्त सचिव [तांत्रिक], भारत शासन, अखिलभारतीय तंत्रशिक्षण परिषद, डी-४७, नवी दिल्ली, साउथ एक्स्टेंशन, पार्ट-१ नवी दिल्ली -४९.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार [तांत्रिक], भारत शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय, [ शिक्षण विभाग ], पश्चिम-विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल ॲश्युरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई-२०.

निवड नस्ती - तांशि-१.